## ➤ महत्त्वाचे

### 'यंग सम्राट' संस्थेतर्फे पाथर्डी फाटा परिसरात आंबेडकर जयंती

**नाशिक ।** पाथर्डी फाटा येथील यंग सम्राट बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १३ एप्रिलला



सायंकाळी ७ वाजता भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर रात्री १२ वाजता डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा येथे सामूहिक बुद्धवंदना होऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आलेल्या मान्यवरांना संविधान प्रतीचे वाटप करण्यात आले. यावेळी संदीप दोंदे, विशाल दोंदे, उत्सव समिती अध्यक्ष ॲड. अमित दोंदे, मिलिंद गायकवाड यांच्या वतीने विविध कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते. 14 एप्रिल रोजी सकाळपासून संध्याकाळपर्यंत विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी छावा मराठा संघटनेचे डॉ विलास पांगारकर, पोलीस उप आयुक्त मोनिका राऊत, सहाय्यक आयुक्त देशमुख, अंबड पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक हंडे आदीसह मान्यवर उपस्थित होते. सुनील यशवंते, बाळासाहेब अहिरे, यासीन शेख, संतोष वाघमारे, नितीन इंगळे, मुन्ना दोंदे, रोहित पवार, रोहित पवार, अनिल गायकवाड, एम टि जाधव, वाहिद शेख, नितीन कोल्हे, दीपक मोरे, केतन जगताप, शंराव लोखंडे आदींनी विशेष परिश्रम घेतले

### 'जारण'मध्ये झळकणार अमृता सुभाष

**नाशिक ।** हृषीकेश गुप्ते दिग्दर्शित 'जारण' या भयपटाचे पोस्टर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाले. पोस्टर बघून प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न पडले असतानाच आता या चित्रपटातील एक चेहरा समोर आला आहे. या चित्रपटात चौकटीबाहेर जाऊन आव्हानात्मक भूमिका साकारणारी अभिनेत्री अमृता सुभाष महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. 'जारण' हा मानवी भावना आणि दुहेरी आयुष्याचा शोध घेणारा प्रवास असून यात अनेक रहस्ये लपली आहेत, जी प्रेक्षकांना थरारक अनुभव देतील. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये अमृता सुभाषच्या चेहऱ्यावर टाचण्या टोचलेल्या दिसत असून डोळे बरंच काही सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. आता हे रहस्य चित्रपट आल्यावरच उलगडणार आहे. या भूमिकेबद्दल अमृता सुभाष म्हणते, '' मला नेहमी असे वाटते की कलाकाराने एका विशिष्ट प्रकारच्या भूमिकेपुरताच मर्यादित राहू नये. मला नेहमीच प्रयोगशील राहायला आवडते. माझ्या इतर भूमिकांच्या तुलनेत अशी भूमिका मी आजवर कधीच साकारली नव्हती. ही भूमिका माझ्यासाठी तशी आव्हानात्मक होती. परंतु दिग्दर्शक आणि माझ्या सहकलाकारांच्या साहाय्याने माझे हे काम सोपे झाले. ज्यावेळी मी 'जारण'चे स्क्रिप्ट वाचले तेव्हाच हा चित्रपट करण्याचे ठरवले. माझ्या भूमिकेबद्दल मी आता जास्त काही सांगणार नाही, मात्र हे आवर्जून सांगेन, ही एक अशी रहस्यमय कथा आहे, जी प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवेल.' ए अँड सिनेमाज एलएलपी प्रस्तुत आणि ए ३ इव्हेंट्स अँड मिडिया सर्व्हिसेस निर्मित 'जारण' चित्रपट येत्या ६ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून, अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी 'जारण'चे निर्माते आहेत.




### थकित करासह विविध गुन्ह्यांतर्गत जप्त वाहने सोडविण्याचे आवाहन

**नाशिक ।** नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या थकित कर वसुलीसाठी तसेच मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्यांतर्गत कार्यालाच्या आवारात, विविध बस डेपो तथा पोलीस ठाणे यांच्या आवारात जमा करण्यात आलेल्या वाहनांना ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झाला आहे. संबंधित मालकांनी तडजोड शुल्क, मोटार वाहन कर, पर्यावरण कर भरून येत्या १५ दिवसांत वाहन सोडवून घ्यावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राजश्री गुंड यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. जप्त केलेल्या वाहनांपैकी २२ वाहनांच्या प्रकरणांमध्ये वाहन मालक, चालक किंवा वित्तदात्यांनी कार्यालयाशी संपर्क केलेला नाही तसेच वाहन सोडवून घेण्याबाबत हक्क सांगितलेला नाही. या २२ वाहनांची जाहीर ई-लिलावाची प्रकिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित वाहनांची यादी परिवहन कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित केलेली आहे. वाहन सोडवून घेण्याची मुदत संपल्यानंतर ही वाहने बेवारस असल्याचे समजून त्यापैकी रस्त्यावर वापरण्यायोग्य वाहनांचा आणि १५ वर्षे पूर्ण झालेल्या व वापरण्यायोग्य वाहनांचा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीने या वाहनांचा लिलाव www.eauction.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे.

# प्रसार महामानवाच्या कार्याचा!

## 'देखो अपना देश' या योजनेअंतर्गत 'टूर सर्किट' सहलीचे नाशिकसह, नागपूर, मुंबईला आयोजन








**नाशिक ।** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची महती समाजातील सर्वच स्तरातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारच्या पर्यटन विभाग व पर्यटन संचालनालयामार्फत 'देखो अपना देश" या योजनेअंतर्गत टूर सर्किटचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त १४ व १५ एप्रिल रोजी या सहलीचे विनाशुल्क आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी १०५ पर्यटकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त पर्यटन संचालनालयाने आयोजित टूर सर्किट हा एक अभिनव उपक्रम ठरला आहे.

बाबासाहेबांचे विचार, त्यांचे सामाजिक योगदान आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचे कर्तृत्व यांचा गौरव करणे हा या सर्किटचा उद्देश आहे.

या सर्किटद्वारे पर्यटकांना बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडीत महत्त्वाच्या स्थळांचा अनुभव घेता येईल, ज्यामुळे त्यांचा इतिहास आणि तत्त्वज्ञान समजण्यास मदत होईल. पर्यटकांनी इ.स. पूर्व २०० च्या दरम्यान खोदलेली बौद्ध लेणी-त्रिरश्मी लेणी ला भेट देऊन त्याची माहिती घेतली. लेणीच्या पायथ्याशी बांधलेल्या बौद्ध स्मारक स्तूपाला भेट देऊन, स्तूपाभोवती श्रीलंकेतील अनुराधापूर येथून आणलेल्या महाबोधी वृक्षाची शाखा - बोधिवृक्ष) चे दर्शन तसेच स्तूपामध्ये पर्यटकांनी ध्यान आणि प्रार्थना केली. त्यांनंतर आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले त्यातील महत्वाचे काळाराम मंदिर सत्याग्रहच्या स्मरणासाठी काळाराम मंदिर येथे पर्यटकांनी भेट दिली. त्यानंतर येवला येथील मुक्तिभूमी स्मारकास भेट देण्यात आली. सहली दरम्यान पर्यटकांना महामानव आंबेडकरांवरील पुस्तिकेचे वाटप करण्यात आले' अशी माहिती पर्यटन संचालनालय उपसंचालक मधुमती सरदेसाई नाशिक विभाग यांनी दिली.

याप्रसंगी पर्यटकांनी आपला अनुभव कथन करतांना सांगितले शासनाद्वारे सुरु करण्यात आलेला हा उपक्रम अतिशय उपयुक्त आहे, १४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या या सहलीमध्ये सहभागी होण्याची संधी बाळगोपाळांसह अबालवृद्धांसाठी ही सहल पर्वणी ठरली आहे. पर्यटनासह अभ्यास दौरा देखील झाला आहे.

## झालं सोनं या जीवनाचं, केली भिमाने एकच सही!

### रक्तातून साकारली बाबासाहेबांची स्वाक्षरी



**देवळाली कॅम्प ।** सामाजिक कार्यकर्ते, उच्च शिक्षित आणि इंटरनॅशनल ब्लड आर्टिस्ट डॉ. संतोष कटारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अनोखे अभिवादन केले आहे.

बाबासाहेबांच्या ऐतिहासिक स्वाक्षरीचे चित्र त्यांनी स्वतःच्या रक्ताने साकारले असून, ही कलाकृती सामाजिक चेतनेचा आणि प्रेमाचा आगळा-वेगळा आविष्कार आहे. डॉ. कटारे यांचं हे कार्य केवळ चित्रकलेचा नमुना नसून, ते बाबासाहेबांच्या विचारांची, त्यांच्या योगदानाची आणि त्यांच्या प्रति असलेल्या निस्सीम श्रद्धेची सजीव साक्ष आहे. या पूर्वीही त्यांनी अनेक थोर व्यक्तिमत्त्वांची चित्रं रक्तातून रेखाटून जनजागृती केली आहे, मात्र बाबासाहेबांची स्वाक्षरी तयार करताना त्यांचं मन हेच कुंचलं झालं, असं ते म्हणतात. या विशेष कलाकृतीतून बाबासाहेबां विषयीचं प्रेम, कृतज्ञता आणि त्यांचं विचारविश्व समोर येतं. "स्वाक्षरी ही फक्त अक्षर नाही, ती एका महामानवाच्या आयुष्याचं आणि क्रांतीचं प्रतीक आहे", असं डॉ. कटारे यांनी सांगितलं.

## वैष्णव स्पर्श हौसिंग सोसायटीत भिमजयंती उत्साहात

**देवळाली कॅम्प ।** भैरवनाथ मंदिरा जवळील वैष्णव स्पर्श को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीत दरवर्षी प्रमाणे यंदाही भिम जयंती मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वधर्म समभाव जपणाऱ्या या सोसायटीत प्रत्येक सण आनंदाने व एकोप्याने साजरा केला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान बुद्ध वंदनेने करण्यात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान बुद्ध व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी बाबासाहेबांच्या विचारधारेवर प्रकाश टाकत उपस्थितांना प्रेरणा दिली. बालगोपाळांनी सादर केलेल्या नृत्यांनी कार्यक्रमात रंग भरला. यानंतर सर्व भीम सैनिकांनी स्वादिष्ट मेजवानीचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाला उद्योजक योगेश ताजनपुरे, पत्रकार भैयासाहेब कटारे, किरण बोऱ्हाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याशिवाय चेअरमन योगेश



नवनाथ शहाणे, सेक्रेटरी शुभांगी मनोहर चौधरी, खजिनदार सुनिल काळे, महिला सदस्य एलिशा अमित चोभे, तसेच मनोज कुमार परदेशी, हेमंत काळे, राहुल कटारे, भगवान गांगुर्डे, स्वप्नील भालेराव, मीनानाथ थोरात, प्रशांत विसपुते, बाळासाहेब खतोडे, गणेश गायखे, गोपाल शिंदे, सलीम खान, अमित चौभे, दिनकर कडभाने, दीपक कथले, अरुण लांडगे, राजू थोरात, संदीप रानडे, ज्ञानेश्वर वारुंगसे, आदर्श भगत, संदीप सातपुते, अरुण लाजरस, राहुल जाधव, राजू थेटे, युनूस मणियार, मंगेश गोडसे, मनोहर चौधरी, रघुनाथ सरोदे, सुनील शेळके, शोभा घोडे, पवन कुमार परदेशी, संजय गोसावी, नारायण काजळे, सनी ताकवले, रिपन रॉय आदी मान्यवरांनी हजेरी लावली. मॉंटी काळे यांनी प्रभावी सूत्रसंचालन करून कार्यक्रम यशस्वी केला.

## नासिक सायकलिस्ट फाउंडेशनचे सदस्य तथा जलतरणपटूचा डंका



**नाशिक ।** नासिक सायकलिस्ट फाउंडेशनचे संचालक दीपक भोसले यांच्यासह बिजेंद्र मलिक, शंतनु दास, डॉ. सपना नेरे, संदीप दास यांनी १२ एप्रिल रोजी कोची येथे भारतातील सर्वात लांब नदी स्विमॅथॉनमध्ये सहभाग घेत यशस्वीरित्या पूर्ण केले. कोची अल्ट्रा स्विमॅथॉन २०२५ यामध्ये या जलतरणपटूनी सहभाग नोंदविला होता. दास, मलिक आणि डॉ. नेरे सपना यांनी १० किमी अंतर पूर्ण केले. सर्वात ज्येष्ठ जलतरणपटू दीपक भोसले यांनी ६२ वर्षांच्या वयात ६ किमी पूर्ण केले आणि सर्वांना तंदुरुस्त आणि सक्रिय जीवन जगण्याची प्रेरणा दिली. हे सर्व जलतरणपटू नाशिक सायकलिस्टचे सदस्य आहेत आणि सावरकर जलतरण तलावात नियमितपणे सराव करतात.

**कोची अल्ट्रा स्विमॅथॉन २०२५ यशस्वी सहभाग**

## ओझर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त परिसंवाद




## संविधानामुळेच भारतीय राज्य व्यवस्था सक्षम : प्रा. टर्ले

**ओझर ।** जगातील अनेक देशांमधील लोकशाही राज्यव्यवस्थेला राज्यघटनांमधील त्रुटींमुळे बाधा निर्माण झाली,मात्र भारतीय लोकशाही राज्यव्यवस्था अतिशय सक्षम असून भविष्यातही ती सक्षमच राहणार आहे याचे संपूर्ण श्रेय सर्वांगीण आणि गुणवत्तापूर्ण भारतीय संविधानातच आहे असे प्रतिपादन नाशिक जिल्हा कॉलेज टीचर्स संस्थेचे संचालक प्रा. अण्णाभाऊ टर्ले यांनी ओझर महाविद्यालयात केले.


ओझर येथील मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आयोजित संविधान निर्मिते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर आयोजित परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. टर्ले बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर. गडाख होते. तर मंचावर प्रमुख वक्ते म्हणून उपप्राचार्य डॉ वसंतराव कदम ,प्रा. नारायण पाटील, प्रा. डॉ.एम डी दुगजे, प्रा. बी टी शिंदे, प्रा. नामदेव शेजवळ, प्रा. व्ही एल गावले उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गडाख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वप्रथम आदर्श विद्यार्थी ,अभ्यासक होते हे पटवून दिले तसेच महाविद्यालयात आयोजित महाराष्ट्र शासन निर्देशित 18 तास अभ्यास अभियान, प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा यात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्रा.नारायण पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, मराठी वैचारिक साहित्य सर्वांनी अभ्यासावे असे आवाहन केले. उपप्राचार्य डॉ. कदम यांनीही डॉ. आंबेडकरांचे संविधान ही भारतीय जनतेला एक देणगी आहे हे पटवून दिले. यावेळी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय संघटना जिल्हा कार्याध्यक्षपदी प्रा. नामदेवराव शेजवळ यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रा. व्ही एल गावले यांनी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले. तर कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. बी टी शिंदे यांनी आभार मानले कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'गीत नवे गाऊ' काव्यसंग्रह छोट्यांसह मोठ्यांनाही मेजवानी!

कवी राजेंद्र सोमवंशी लिखीत बालकाव्यसंग्रह "गीत नवे गाऊ " हा छोट्यांसोबतच मोठ्यांनाही मेजवानीच म्हणावी लागेल. कारण काही कविता वाचताच मोठयाना त्यांचं बालपण आठवतं. काव्यसंग्रहच्या सुरुवातीलाच म्हणजे पहिली कविता "ज्ञानमंदिर "अर्थात शाळा! जिथून आपलं सुंदर जीवन कसं घडतं हे कवीने सुंदर शब्दात मांडले आहे.

**'मानवतेचा जपू वारसा, बंधू भगिनी कुणी ना परका, ऐक्याचा संदेश जगाला, बाळकडू ते समतेचे' 'चल शिकाया चल गं सरू'** या सुंदर कवितेत कवी शिक्षणाचे महत्व पटवून देतात. लहान मुलांना सर्वात जवळची व्यक्ती म्हणजे आई. आपली आई किती ग्रेट असते. खरं तर ती देवाने दिलेली सुंदर भेट आहे असे कवी, 'माझी आई ग्रेट आहे' यात सांगतात. आपल्या मराठी भाषेबद्दलचा गर्व 'मराठीची लेकरं' या कवितेत दिसून येतो.

**आईच्या या दुधापरी, कृपा तिची आम्हावरी, अमृताचा स्पर्श तिचा, जिभेवर साखर...** अशा सुंदर शब्दात कवीने मराठी भाषेचे महत्व आणि तिच्याशी असलेलं नातं सांगितलं आहे. 'कडक मडक आपलं गाव, घ्यायचं नाय भाऊ आपलं नाव' या ओळीतून निसर्गसौंदर्याने नटलेल्या गावाकडच्या मुलाचा रुबाब 'आपलं गाव' या कवितेत दिसून येतो. 'थेंबथेंब वाचवा 'कवितेत पाणी वाचवण्याचा संदेशही कवी देतात. पाण्याचं मोल समजून सांगतात. पाणी आपलं जीवन आहे आणि ते जपून वापरायचा संदेश देतात. 'बाप्पा' कवितेत निरागस बालमन मनात बाप्पाला विनवते कि,"बाप्पा तू वर्षातून दोनदा ये "यातून बाप्पाबद्दलची प्रेम,भक्ती दिसून येते. 'विनवणी' कवितेत मुलं बापाला विनवणी करतात की, आधार आमचा तुम्ही दादा फास नका हो घेऊ... खरंच कविता वाचून डोळे भरून येतात. गरिबी असूनही मुलांची शिकण्याची जिद्द, चिकाटी त्यात दिसते. फांदीच होऊनी 'आई' बघ फुलास झोका देते... अर्थात झाडाच्या फांदीतही कवीला फुलाची आई दिसते. मज वाटे फुलंच व्हावे त्या फांदीवर फुललेले... यातून झाडाशी नातेही दिसते. "आभाळाची आम्ही लेकरे




**पुस्तक परीक्षण...**

यात पक्षी आभाळाची लेकरं आहेत. धरती आई आणि नभास बाबा" असे कवी म्हणतात. पाखरांच्या माध्यमातून मानवतेचा संदेश कवी देतात भेदभाव नको असेही सांगतात. जग हे प्रत्येकाचे घर आहे. त्यात सर्वांनी भेदभाव न करता राहावं. विश्वाला बंधुत्वाचे परिमाण द्यावं. 'नवा दीप लावू 'मध्ये निसर्गातील घटकांना सोबत घेऊन सुंदर संदेश कवी देतात. जसे: सूर्य, आभाळ, झरा, फुले सूर्यासारखी किरणे अंतरंगात घेऊन प्रकाशात न्हाऊ. झऱ्यासारखं सतत न थांबता धावत राहू. फुले जसे गंध देतात तसे दुसऱ्याला छान छान देत राहू."हात जोडू त्याला" कवितेत निसर्गाच्या घडणाऱ्या घटनावर बालमनाला कसे प्रश्न पडतात याचे वर्णन आहे. त्यावर आई म्हणते की, "ही सारी त्या विधात्याची कृपा आहे त्याला हात जोडू. "आनंद वाटू जगामध्ये " यात आनंद घ्या आनंद द्या असे सांगून कवी म्हणतात, "दुसऱ्यासाठी दुःखाचे नकाच पेरू काटे तिचं वेदना कधीतरी येई आपुल्या वाटे.... आनंदाचा धडा आपण निसर्गातून घ्यावा शेवटी म्हणतात की आनंदाविन सारेच खोटे, कशास किंतु मनामध्ये... आरोग्यासाठी मैदानी खेळ किती महत्वाचे हेही, "चला खेळूया खेळ रे" कवितेतून दिसते. त्यासाठी मैदानाशी मैत्री असणे ही सवय मात्र हवीच. "कोल्होबाची फजिती "मध्ये सुंदर गमतीजमती आहेत ज्या मुलांना नक्कीच आवडतात. तसेच खारुताई असेल नंदीबैल असेल सारीच माहिती कवितेतून मुलाना मिळते. प्रत्येक कवितेतून कवी एक वेगळा संदेश देतात ज्याचा योग्य परिणाम नक्कीच बालमनावर होईल. मग ते राष्ट्र ध्वजाचा आदर असेल, झाडे लावा असेल, पाणी वाचवा असेल, शाळा शिकू असेल, मराठीचा आदर अभिमान असेल, बाप्पाची भक्ती असेल, आरोग्याची जपणूक,किंवा अजुन काही. त्यासाठी त्यांनी निसर्गातील घटकांचा योग्य ठिकाणी वापरही केला आहे.जेणेकरून लहान मुलांना ते सहज आकलन होईल. सुंदर असे मुखपृष्ठ तर आहेच पण प्रत्येक कवितेला साजेसं असं सुंदर चित्रंही आहे. त्यामुळे मुलांना वाचताना एक वेगळाच आनंद ही मिळतो. लयबद्ध कविता, सोपी भाषा आणि योग्य संदेश यांचा सुंदर मिलाप "गीत नवे गाऊ "या संग्रहात कवी राजेंद्र सोमवंशी यांनी घडवून आणला आहे. लहानग्यांचा विकास घडवण्यासाठी ही साहित्यकृती नक्कीच उपयुक्त ठरेल....

**– वंदना गांगुर्डे, नाशिक**

### ➤ महत्त्वाचे

## उदोजी महाराज वारसा संग्रहालयात दिसणार आता राजर्षी शाहू महाराजांचे आज्ञापत्र..!

**नाशिक ।** बहुजन समाजातील हजारो विद्यार्थ्यांनी ज्या वसतिगृहातून आपले शिक्षण पूर्ण करून करियर घडविले, त्या उदोजी मराठा वसतिगृहाच्या भूमिपूजनाप्रसंगी राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या देणगीच्या आज्ञापात्राची मूळ प्रत आता उदोजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात कायमस्वरूपी बघायला मिळणार आहे. मविप्र संस्थेने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, १०५ वर्षांच्या इतिहासाला उजाळा मिळेल, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे यांनी केले. उदोजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय व उदोजी अर्ली हेरिटेज स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने उदोजी महाराज वारसा संग्रहालयात उदोजी मराठा वसतिगृहाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, सेवक सदस्य डॉ. एस. के. शिंदे, सी. डी. शिंदे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ.नितीन जाधव, डॉ. विलास देशमुख, डॉ. कैलास शिंदे, डॉ. अजित मोरे, प्रा. शशिकांत मोगल, प्राचार्य प्रशांत पाटील, होरायझन अकॅडमीच्या मुख्याध्यापिका डॉ. निधी मिश्रा, ज्योती सामंता, नेहा सोनवणे, दीप्ती पटेल उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या देणगीच्या आज्ञापत्राच्या मूळ प्रतीचे अनावरण करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी प्रा. शशिकांत मोगल यांनी प्रास्ताविकात सांगितले की, सन १९१४ मध्ये स्थापन झालेल्या मविप्र संस्थेच्या स्वमालकीच्या पहिल्या वास्तूचे भूमिपूजन राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते १५ एप्रिल १९२० रोजी झाले. त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी १५ हजार रुपये देणगी दिली होती. यासंदर्भात ठराव (आज्ञापत्र) करण्यात आला होता. त्याची मूळ प्रत मविप्रने केलेल्या पाठपुराव्यामुळे नुकतीच कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयाकडून प्राप्त केली आहे. हा ऐतिहासिक अमूल्य ठेवा जतन व्हावा, या हेतूने या ठरावाच्या मूळ प्रतीचे आज वसतिगृहाच्या स्थापनादिनी अनावरण करण्यात आले. उदोजी अर्ली स्कूलच्या शिक्षिका श्वेता गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी केबीजीटी महाविद्यालयाचे विद्यार्थी, उदोजी मराठा वसतिगृहाचे माजी विद्यार्थी, उदोजी संग्रहालयाचे सर्व कर्मचारी, उदोजी अर्ली स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते.

## व्ही. एन. नाईक महाविद्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**नाशिक ।** क्रां.व्ही.एन.नाईक शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे उपप्राचार्य डॉ.पौर्णिमा बोडके व कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र तिवडे यांच्या हस्ते पूजन करून व पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.शरद काकड, डॉ.विजय नौकुडकर, डॉ.संजय काळे, डॉ.धनराज गोस्वामी, डॉ.हेमेंद्र शिंदे, डॉ.नंदादेवी बोरसे, डॉ.मेघा भामरे, डॉ.स्मिता कडवे, डॉ.रेखा जाधव, प्रा.वैशाली राऊत, प्रा. प्रतिभा बोरसे, प्रा.धनश्री दराडे, प्रा.कविता सोनवणे, प्रा.सुभाष आव्हाड, किसन कातकडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा.डॉ.शरद काकड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## सुधाकर देशमुख यांना मातृशोक

**पनवेल ।** पनवेल महापालिकेचे तत्कालीन



आयुक्त् सुधाकर देशमुख यांच्या मातोश्री कै. हिराबाई विष्णु देशमुख यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. समाजातील विविध स्तरातून त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. कै. हिराबाई विष्णू देशमुख या १९५६ मध्ये जावळेकडलग या गावातील पहिल्या सातवी शिकलेल्या महिला ठरल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात शिक्षणाला अतिशय महत्व दिले जात होते. कै. हिराबाई आयुष्य हे केवळ मायेचं नव्हते, तर कष्टाचं, धैर्याचं आणि प्रेरणादायी कार्याचे होते. त्या शेतकरी कुटुंबातून होत्या. त्यांनी आपल्या तिन्ही मुलांना विज्ञान शाखेत शिक्षण दिलं. त्या काळात नळवाडी गावातील विज्ञान शाखेतील पहिली पदवीधर मुलं त्यांचीच होती. याशिवाय, नळवाडी गावात कोणत्याही लहान मुलाला जरी काही आजार झाला, तरी आजीकडे त्यावर उपाय असायचे, जसे की सरी (मानदुखी) बरी करण्याचे उपाय, पोटदुखीवरील घरगुती उपचार, हाडं व स्नायूंवरील फिजिओथेरपीसारख्या पद्धती. त्यांचं ज्ञान आणि अनुभव गावासाठी एक जिवंत वैद्यकीय शाळाच होती. सुधाकर देशमुख यांच्या वर त्यांच्या आईचे विशेष प्रेम होते. शेवटच्या क्षणापर्यंत त्या त्यांना साथ देत राहिल्या, आशीर्वाद देत राहिल्या. त्या आपली माया, आपुलकी, आणि आशीर्वाद घेऊन गेल्या, पण त्यांच्या आठवणी, त्यांच्या आठवणींची उब, आणि त्यांनी दिलेला प्रेमाचा वारसा कायमच त्यांच्या कुटुंबा सोबत राहिला आहे.कै. हिराबाई विष्णु देशमुख यांचा दशविधी सोमवार दि.२१ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता गंगाश्रम नळवाडी ता.सिन्नर जिल्हा नाशिक येथे करण्यात येणार असल्याचे त्यांच्या कुटुंबाकडून सांगण्यात आले आहे.

# काठे गल्लीतील ‘ते’ अनधिकृत धार्मिक स्थळ अखेर हटविले

### मनपाच्या अतिक्रमण विभागाची भल्या सकाळी कारवाई





**नाशिक ।** अखेर काठे गल्ली येथील‘ते’ वादग्रस्त धार्मिक स्थळ महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने बुधवारी भल्या सकाळी मोहीम राबवित जमीनदोस्त केले. उच्च न्यायालयाने काठे गल्ली येथील सातपीर बाबा दर्गा अनधिकृत ठरवत ते हटविण्याचे आदेश नाशिक महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेने कारवाई केली.

वक्फ बोर्ड उच्च न्यायालयात या दर्ग्याबाबत ठोस पुरावे सादर न करू शकल्याने उच्च नायल्याने हे धार्मिक स्थळ अनधिकृत ठरवित ते हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेने १ एप्रिल रोजी ट्रस्टला नोटीस बजावत स्वतःहून हे धार्मिक स्थळ हटविण्याचे



आवाहन केले होते. दिलेल्या मुदतीत ट्रस्टने अतिक्रमण न काढल्याने अखेर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने बुधवारी सकाळी ६ वाजता अतिक्रमण मोहीम राबवत सदर धार्मिक स्थळ हटविले. त्यासाठी ४ जेसीबी, ६ ट्रक, २ डंपर आणि सुमारे ५० कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही मोहीम राबविली. यावेळी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मोहीम दरम्यान पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

- **कारवाईच्या पूर्वरात्री जमावाकडून पोलिसांवर दगडफेक**
- **पोलिसांकडून लाठीचार्ज, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या**
- **३१ पोलीस अधिकारी, कर्मचारी किरकोळ जखमी**
- **जमावाकडून वाहनांची तोडफोड, पोलीस वाहनही लक्ष्य**

### कारवाईच्या पूर्वरात्री जमावाकडून धुडघूस

मनपाच्या अतिक्रमण विभागाकडून दर्गा उदध्वस्त केला जाणार असल्याने मंगळवारी (दि.१५) रात्री संतप्त जमावाने प्रचंड धुडगूस घातला. ४०० पेक्षा अधिक जमावाने दगडफेक करीत वाहनांचीही मोडतोड केली. यातून पोलीस वाहनही सुटले नाही. जमावाने केलेल्या दगडफेकीत ३१ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज करीत अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या, अशी माहिती पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांनी दिली. दरम्यान काठेगल्ली परिसरात दक्षता म्हणून अजूनही पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# ओझर नगरपरिषदेवर विविध समस्यांबाबत दिंडी मोर्चा

### प्रशासनाने येत्या दहा दिवसांत सर्व समस्या सोडवण्याची ग्वाही दिल्यानंतर आंदोलन मागे

**ओझर ।** विविध समस्यांबाबत वेळोवेळी निवेदन देऊनही, पाठपुरावा करूनही दखल न घेतल्याने समस्यांबाबत प्रशासनाला जाग येण्यासाठी वारकऱ्यांच्या वतीने मारुती मंदिर ते नगरपरिषद पर्यंत टाळमृदगाच्या गजरात भजन व अभंग गात दिंडी मोर्चा काढण्यात आला.

येथील मारूती वेस जवळील पाहुणा मारूती हनुमान मंदिरात सप्ताह चालू असतांना वारकरी संप्रदायाच्या वतीने स्वच्छतेबाबत निवेदन देवूनही नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाने स्वच्छता न केल्याने व निवेदनाची दखल न घेतल्याने तसेच धार्मिक मंदिर स्थळाशेजारील महादेव मंदिराच्या पाठीमागे घाणीचे साम्राज्य व शौंचालयाची दुरावस्था स्मशानभूमीजवळील उखडलेले पेव्हर ब्लॉक, बाहेर आलेले गज उडालेले पत्रे तसेच इतर समस्यांबाबत प्रशासनाला जाग येण्यासाठी वारकऱ्यांच्या वतीने मारुती मंदिर ते नगरपरिषद पर्यंत टाळमृदगाच्या गजरात भजन व अभंग गात दिंडी मोर्चा काढण्यात आला. नगर परिषदेच्या व-हांड्यात ठिय्या मांडून एकनाथी भारुडे व भजन करीत जोपर्यंत मुख्याधिकारी भेटत नाही तोपर्यंत तब्बल तीन चार तास वारकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी महेश गाडगे यांनी ग्रामपंचायत होती त्यावेळी गावच्या विविध वार्डचे प्रतिनिधी मार्फत समस्या मांडायचे. ते सोडवण्याचे प्रयत्न करायचे व किमान वर्षातून एकदातरी जनता






दरबार व विशेष ग्रामसभा घेऊन जनतेच्या समस्या मांडण्यात येत होत्या; मात्र नगर परिषदेवर प्रशासकराज आल्यापासून एकही जनता दरबार किंवा सभा झाल्या नाहीत. आमदार हे तालुक्याचे पालकत्व करतात. त्यांनी यात लक्ष घालण्याची गरज आहे. प्रशासकाने ग्रामसभा किंवा जनता दरबार घेण्याची मागणी केली. यावेळी प्रशासनाने येत्या दहा दिवसात सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर वारकरी संप्रदायाने आंदोलन मागे घेतले. सफाईबाबत त्वरित कार्यवाही केली असल्याचे सांगितले. वारकऱ्यांतर्फे आम्ही जसे गांवासाठी नगरपरिषदे पर्यंत आलो तसे सर्व प्रशासनाने आमच्याबरोबर पायी मारुती मंदिरापर्यंत येण्याचा आग्रह धरल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी सर्वजन आक्रमण झाले होते. पोलिस प्रशासनाच्यावतीने आलेल्या दीपक गुंजाळ यांनी शांततेचे आवाहन करत एक एकाने समस्या सांगण्याचे आवाहन केले. यावेळी ज्ञानेश्वर आहेर यांनी समस्या मांडल्या.

नासिकला बैठक असल्याने मुख्याधिकारी नासिकला होते. आंदोलन कर्त्यांनी मुख्याधिकारी उपस्थित झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असा हट्ट धरला. वेळेचे गांभिर्य लक्षात घेऊन मुख्याधिकारी किरण देशमुख यांनी नगर परिषदेत हजेरी लावत वारकरी संप्रदायाशी चर्चा करून येत्या दहा दिवसात सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. या वारकरी मोर्चात संजय आहेर, पांडुरंग आहेर, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब क्षीरसागर, ज्ञानेश्वर आहेर, दीपक चौरे, पोपटराव बर्डे, कृष्णा आहेर, सुकदेव मंडलिक, ॲड केशव आहेर, सापनर काका, बापू देवरे, हभप भंडारे, पुष्पा अक्कर, शोभा थोरात, शकुंतला गवळी, संगीता आहेर सविता आहेर कल्याणी आहेर, दत्ता तांदळे, मयुरी सोमासे, निर्मला शेटे, ललिता गोसावी, कृष्णा महाराज आहेर, नितीन चौंधरी, विमल सोनवणे, ओम गावंडे, राहूल जंजाळे, रावसाहेब जाधव, लालता भारती, सिताराम बिडवे, दौलत पोटे, श्रावण पोटे, दौलत देवकर, प्रवीण वाघ, महेश गाडगे, रुपेश क्षीरसागर, गणेश शेलार, संजय शिंदे, हर्षल कुलकर्णी, जयसिंग मिस्तरी, आबा पाटील, रमेश टेलर, संजय शिंदे, उत्तम बिडवे, शुभम आहेर, राजेंद्र आहेर, प्रभाकर निकुंभ सुभाष कदम भारत रासणे, गुरुजी ज्ञानेश्वर, शिवले, रमेश शिंदे, विजय शिंदे, रामराव गायकवाड, सुनील कोठावदे, रामचंद्र थोरात आदी उपस्थित होते.

## मुंबई-आग्रा महामार्गावर भरधाव वॅगनरची धडक; महिला गंभीर जखमी

**सिडको ।** मुंबई-आग्रा महामार्गालगत सोमानी हॉस्पिटलसमोरील सर्विस रोडवर एक गंभीर अपघात घडला असून, भरधाव वेगात आलेल्या वॅगनर कारने रस्ता ओलांडणाऱ्या महिलेस जोरदार धडक दिली. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली असून, अंबड पोलीस ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. संगीता रमण शर्मा (वय ३५, रा. आंबेबाहुला, पोस्ट विल्होळी, ता. व जि. नाशिक) या महिला रस्ता ओलांडत असताना, मुंबईहून पाथर्डी फाट्याकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या वॅगनर कार (क्र. एमएच ०३ बीजे ३५८९) ने त्यांना समोरून धडक दिली. या धडकेत संगीता यांच्या डोक्याला तसेच उजव्या हाताच्या दंडाला व मनगटाला गंभीर इजा झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीला धाव घेतली आणि जखमी संगीता यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या अपघाताची माहिती मिळताच अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे आणि सपोनि शेख यांनी घटनास्थळी भेट दिली. संगीता यांचे पती रमण प्रमोद शर्मा (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कारचालक घनशाम एकनाथ राठोड याच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालकाने वाहनावर योग्य नियंत्रण न ठेवल्याने व भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवल्यामुळे हा अपघात घडला. या प्रकरणाचा अधिक तपास अंबड पोलीस करत असून, घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब घेतले जात आहेत.

# महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या एमपीएलची लिलाव यादी जाहीर

- **नाशिकच्या बारा पुरुष, अकरा महिला खेळाडूंची निवड जाहीर**
- **पर्पल कॅपचा मानकरी सत्यजित बच्छाव, रत्नागिरी जेट्सकडेच कायम**

**नाशिक ।** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रीमियर लीग - एम.पी.एल.चा थरार यंदा १० जूनपासून सुरू होणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे पुणे येथे पुरुष महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलावासाठीच्या पुरुष व महिला खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या बारा पुरुष व अकरा महिला खेळाडूंचा समावेश आहे.

नाशिकचा डावखुरा फिरकीपटू व अष्टपैलू खेळाडू, भरवशाचा नामवंत रणजीपटू, महाराष्ट्राचा आघाडीचा गोलंदाज सत्यजित बच्छाव, मागील हंगामात महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये सर्वाधिक बळी घेत उत्कृष्ठ गोलंदाज सन्मान पर्पल कॅपचा मानकरी ठरला होता. सत्यजितने एकूण २५ बळी घेत वसंत राजणे पर्पल कॅपचा बहुमान मिळवला. त्याला यंदादेखील त्याच्या रत्नागिरी जेट्स या संघाने संघात कायम ठेवले आहे (रीटेन केले आहे). त्यामुळे त्याचे नाव लिलाव यादीत नाही. त्याच्या सोबतच या महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलावासाठी, अ श्रेणीत नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचा रणजीपटू मुर्तुझा ट्रंकवाला, ब श्रेणीत कुणाल कोठावदे, प्रतीक तिवारी, रोहन शेडगे व शर्विन किसवे यांची तर विवेक ईशरवाल, रविंद्र मत्च्या, मुस्तानसिर कांचवाला, यासर शेख, मोहित नेगी, हर्षल सेनभक्त व ध्रुव एखंडे या १९ वर्षांखालील खेळाडूची देखील क श्रेणीत समाविष्ट करण्यात आले आहे. अ श्रेणीसाठी रुपये ६० हजार, ब श्रेणीसाठी ४० हजार तर क श्रेणीसाठी २० हजार ही बेस प्राइज असेल.




महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे पुणे येथे पुरुष महाराष्ट्र प्रीमियर लीग च्या लिलावासाठीच्या एकूण ३४६ खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली. त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या बारा खेळाडूंचा समावेश आहे. याबरोबरच महिला महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलाव यादीत नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या ईश्वरी सावकार, तेजस्विनी बाटवाल, रसिका शिंदे, प्रियंका घोडके व माया सोनवणे यांची अ श्रेणीत, ऐश्वर्या वाघ, शाल्मली क्षत्रिय, कार्तिकी गायकवाड, मधुरा दायमा यांची ब श्रेणीत तर लक्ष्मी यादव व श्रुती गीते यांची क श्रेणीत निवड झाली आहे. महिला खेळाडूंसाठी देखील अ श्रेणीसाठी रुपये ६० हजार ब श्रेणीसाठी ४० हजार तर क श्रेणीसाठी २० हजार हिच बेस प्राइज असेल. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे पुणे येथे महिला महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलावासाठीच्या एकूण २०४ खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली. त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या अकरा महिला खेळाडूंचा समावेश आहे.

महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलाव यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या वरील सर्व क्रिकेटपटूंना पुढील प्रक्रियेसाठी नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## महत्त्वाचे

### सामाजिक रचनेचा पाया डॉ. आंबेडकरांनी घातला : बी. जी. वाघ



**नाशिक ।** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या सामाजिक रचनेचा पाया घातला. देशात सामाजिक व आर्थिक समता असल्याशिवाय लोकशाही टिकणार नाही, असा इशारा त्यांनी दिला होता. दुर्दैवाने तो खरा होताना दिसत असून, देशात सध्या आर्थिक व राजकीय सत्ता एकवटल्या असल्याची खंत माजी जिल्हाधिकारी तथा साहित्यिक बी. जी. वाघ यांनी व्यक्त केली. सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने महात्मा फुले जयंती व डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात वाघ बोलत होते. मु. शं. औरंगाबादकर सभागृहात हे व्याख्यान झाले. वाघ यांनी 'डॉ. आंबेडकरांची ज्ञानसाधना' या विषयावर विवेचन केले. ते म्हणाले, डॉ. आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तर होतेच; पण त्यांनी देशाच्या औद्योगिक, वित्तीय, सामाजिक रचनेचाही पाया घातला. उद्योग, शेती व शेतकरीविषयक धोरणे त्यांनीच निश्चित केली. शेतमालाचा विमा काढण्याची मागणी सर्वप्रथम त्यांनीच केली होती. देशातील मूलभूत उद्योग सरकारच्या मालकीचे असावेत, असे त्यांचे मत होते. देशातील जातिव्यवस्थेवर त्यांनी घणाघाती टीका केली. 'अनहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथातून त्यांनी जातिव्यवस्थेला कोणताही शास्त्रीय पाया नसल्याचे स्पष्ट केले आहे. जात ही अज्ञानावर उभी असलेली संकल्पना असून, देशातील सर्वांचा 'डीएनए' एकच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके अध्यक्षस्थानी होते. जयप्रकाश जातेगावकर यांनी प्रास्ताविक केले. जयेश बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. सुनील कुटे यांनी आभार मानले. संजय करंजकर, सुरेश गायधनी, अभिजित बगदे, गिरीश नातू, सोमनाथ मुठाळ, प्रेरणा बेळे आदी उपस्थित होते.

### आडगाव विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती



**आडगाव ।** रयत शिक्षण संस्थेचे, न्यू इंग्लिश स्कूल, आडगाव विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक राजू साठे, प्रमुख पाहुणे विद्या शिंदे, विजय जाधव, रवींद्र जाधव, अजय शिंपी, पर्यवेक्षक संदीप शिंदे, लाईफ वर्कर- रयत शिक्षण संस्था, सातारा कैलास बागले, जेष्ठ शिक्षक जनार्दन धुम, अतुल माळेकर, राजेंद्र पोतदार, कैलास खैरणार, पंडितराव सपकाळ, महादू वाडू, हेमराज नारे, नितिन शिंदे, दत्तात्रय नागमोते, शुभांगी पाटील, वैशाली दिघे, हेमा शेळके, उर्मिला भोये, सुजाता पवार यांनी प्रतिमा पुजन केले या प्रसंगी संतोष फुलमाळी, प्रसाद तुपे, पावरा जगीराम, जगदिश पाटील, प्रविण गावीत, सचिन भोये, योगेश गांगोडे, बबलू कोकणी, विजय मोरे, पागारे एस.पी. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू भगिनी व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक संतोष फुलमाळी यांनी केले तर लावण्या पगार, आरध्या ढिकले, जान्हवी जाधव, श्रावणी जाधव, प्रांजल जाधव, ऋतुजा शिंदे, यश सपकाळ, तनिष्का रिकामे, गार्गी गंडे, विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांविषयी मनोगत व्यक्त केले. क्रार्यक्रमाचे प्रमुख वक्ते कैलास बागले यांनी आडगावकर व बाबासाहेब आंबेडकर यांचा वकिली निमित संबंध कसा आला होता यासंबंधी माहिती दिली जनार्दन धुम, विदयाताई शिंदे यांनी बाबासाहेबांचे शैक्षणिक जीवना संदर्भात संदेश भाषणातून प्रतिपादन केले.बाबासाहेबांच्या जयंती निमित विद्यालयात सप्ताहभर विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यात वक्तृत्व स्पर्धेत लहान गटात यश सपकाळ, लावण्या पगार, गार्गी गंडे तर मोठ्या गटात तनिष्का रिकामे, ऋतुजा शिंदे, श्रृतिका आकात, श्रावणी जाधव तर निबंध स्पर्धेत-करण भोर, वेदेही अमृतकर, गुंजन वेलदार, प्रांजल जाधव, वेदिका माळोदे तसेच चित्रकला स्पर्धेत चेतन जाधव, अनुज मोरे, शिवम जाधव, विजय शिंपी तसेच विदयालयातील विद्यार्थी ज्ञानेश्वरी माळोदे व संकेत बाराळे उपस्थित होते. प्रथम आलेल्या विद्यार्थीना मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य बक्षीसे देवून गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक राजू साठे यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्यासंबंधी माहिती मनोगतातून चवदार तळ्याचा प्रसंग सांगून उपाशी असले तरी चालेल.. पण पुस्तके वाचा.. हा संदेश देवून स्वतःच्या शैक्षाणिक जीवनात आलेल्या अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन जनार्दन धुम, अतुल माळेकर, कैलास खैरणार, हेमराज नागपुरे, वैशाली दिघे, शुभांगी पाटील यांनी केले. सुत्रसंचालन संस्कृती शिंदे व वेदिका शिंदे यांनी केले. सांस्कृतिक विभागाच्यावतीने वेदिका शिंदे हिने उपस्थितांचे आभार मानले.

# मनपाच्या 'त्या' कथित महिला प्रशिक्षण कार्यक्रमाची सखोल चौकशी व्हावी

## दायित्व सेवाभावी संस्थेची आग्रही मागणी

**नाशिक ।** महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविण्यात आलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत संशयाचे गडद काळे ढग निर्माण झाले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा सुरू आहे. त्यामुळे 'दूध का दूध आणि पानी का पानी' हे सिद्ध करण्यासाठी महापालिकेच्या अतितत्पर आणि कर्तव्यदक्ष (?) आयुक्तांनी या संपूर्ण कार्यक्रमाची सखोल चौकशी करण्याची मागणी येथील दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने केली आहे.

शहरातील गरजू आणि सामान्य-गरीब महिलांसाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने महिला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. महिलांना विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मोलाची भूमिका निभावणाचा गोमटा प्रयत्न महापालिका करीत आहे यात शंका नाही; परंतु गैरकारभार आणि टक्केवारीत अडकल्याने या प्रशिक्षण कार्यक्रमाची पार रया गेली. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा झाली. काही सामाजिक कार्यकर्ते, संस्था-मंडळांनी आयुक्तांकडे तक्रारी केल्या. ज्या वेळेस आयुक्त मनीषा खत्री यांनी आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली त्यावेळेला त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याचे ठोस आश्वासन दिले होते; परंतु तीन-चार



महिने उलटूनही अद्याप आयुक्तांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही. त्यामुळे हे कथित प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

महिला प्रशिक्षणातील गैरकारभाराच्या रंगलेल्या खमंग चर्चेचे कवित्व अजूनही सुरूच आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू होऊनही या बहुचर्चित प्रकरणाची चौकशी अद्याप सुरू झालेली नसल्याने याबाबतच्या चर्चांना अधिक उत आला आहे. कार्यतत्पर आयुक्तांकडून या कथित प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींना शास्ती होईल, अशी बाळगलेली मनीषा अखेर फोल ठरली आहे. गेल्या वर्षात महापालिकेचा महिला प्रशिक्षणाचा विषय यामध्ये झालेल्या गैरकारभारामुळे खूपच गाजला होता. टक्केवारीभोवती पिंगा घालणारे हे प्रकरणव संबंधित ठेकेदार संस्था आणि अधिकाऱ्यांच्या हितसंबंधामुळे चांगलेच वलयांकित झाले होते, आहे. या विषयावर शहरात सर्वदूर चर्चा झडत होत्या. तरीही सारे काही नियमाप्रमाणेच झाले आहे, चौकटीतच झाले आहे, पारदर्शकप्रमाणेच झाले आहे, असे भरभक्कम समर्थन करीत संबंधितांनी वेळ मारून नेली. त्यानंतर महापालिकेच्या आयुक्तपदी मनीषा खत्री यांची नियुक्ती झाल्यावर या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याच्या मागणीने जोर धरला. आयुक्त मनीषा खत्री यांनी या प्रकरणाची सविस्तर व सखोलपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचा शब्दही दिला होता. आता तरी आयुक्त या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन त्याची तड लावणार का याकडे शहरातील समस्त महिला वर्गाचे लक्ष वेधले आहे. महिला प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम कितीही स्तुत्य असला तरी टक्केवारीच्यात गर्तेत अडकल्याने तो गैरप्रकरणाच्या रांगेत अग्रणी जाऊन बसला आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील संबंधितांपासून तर त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या घटकांपर्यंत साऱ्यांकडेच संशयाची सुई फिरते. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक शास्ती करावी, अशी मागणी दायित्व संस्थेच्या अध्यक्ष किरण भावसार, खजिनदार सीमा परदेशी, सचिव आकाश भावसार, निमंत्रित सदस्य संदीप जोजारे, तुषार जाधव, प्रशांत बोरसे, अनिल येवले, ईश्वर वाघमारे, सोनाली भालेराव, वैष्णवी परदेशी, समन्वयक दीपक भावसार आदींनी केली आहे. या संदर्भात आयुक्तांची भेट घेऊन तक्रार करणार असून, चौकशी न झाल्यास या संपूर्ण प्रकरणाच्या विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविणार असल्याचे सांगितले आहे.

### संबंधित संस्था वलयांकित

महिला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे दायित्व स्वीकारलेल्या संबंधित संस्थेच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. संस्थेच्या माणसांनी याबाबत साऱ्यांना मॅनेज केल्याची, करत असल्याची भूमिका निभावली असल्याची खमंग चर्चा आहे.

### आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष

यंदा महिला प्रशिक्षणाचा विषय खूपच गाजला. महिलांना प्रशिक्षण देताना मूळ हेतुलाच हरताळ फासला गेला की काय असे वाटते. आता सर्व मदार आयुक्तांवर आहे. त्यांनीच मानवतेच्या दृष्टीने या प्रकरणाकडे पाहिले तर तर लाभार्थी महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल आणि भविष्यात असे गैरप्रकार घडण्यास जरा चाप बसेल. या प्रकरणाच्या चौकशीस होत असलेला वा झालेला विलंब यामुळे आयुक्तांकडेही संशयाची सुई फिरू लागली आहे.



# अडचणीतील जिल्हा बँकेला कृषिमंत्र्यांकडून अशीही मदत

## कन्येच्या जन्मदिनानिमित्त ५० लाखांची एफडी

**सिन्नर ।** आर्थिक अडचणीत सापडलेल्या नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी बँकेत ५० लक्ष रुपयांची एफडी करून सहकार्य केले आहे.

ना. कोकाटे यांनी त्यांच्या सुकन्या सिमंतिनी कोकाटे यांच्या जन्मदिनानिमित्त अडचणीत असलेल्या एन.डी.सी.सी. बँकेच्या प्रगतीसाठी बँकेत रुपये लाख रुपयांची एफडी केली. यावेळी तालुक्याचे सहाय्यक निबंधक संजय जी गिते, तालुका सचिव दत्ता पगार, विभागीय अधिकारी भारत आरोटे, किरण महात्मे यांच्या अधिकारी उपस्थित होते.

# नाशिकच्या नलिनी कड यांनी सर केला एव्हरेस्ट बेस कॅम्प...

**नाशिक ।** येथील धाडसी महिला नलिनी मधुकर कड यांनी काल (दि.१५) वयाच्या ५२ व्या वर्षी एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केला. तिरंगा झेंडा फडकावून नाशिकचे नाव उज्ज्वल केले. विशेष म्हणजे ही मोहीम केवळ त्यांनीच पूर्ण केली.

त्यांच्या समवेत कोल्हापूरच्या नीलिमा देशपांडे होत्या त्यांना शेवटच्या टप्प्यात मोहीम अर्धवट सोडावी लागली. मात्र दोघींनी एकमेकींना साथ देत खडतर परिस्थितीवर मात करीत आव्हान पेलले. दि. ६ तारखेला नलिनी कड यांनी नेपाळ मधील काठमांडू गाठले. नंतर लुकरा येथून एव्हरेस्ट बेस कॅम्पकडे कुच केले. सोबत एक नेपाळी गाईड होता. दररोज ८ ते १० तास चालत खडतर मार्गाने १० दिवसात चढाई केली. सर्वत्र बर्फाचे पसरलेले थर, जीव गोठविणारी कडाक्याची थंडी, दाट धुक्यामुळे डोळ्यांसमोरचा रस्ता हरवलेला असताना नलिनी कड व नीलिमा देशपांडे यांनी हार मानली नाही. तहान भुकेवर मात करून ध्येय गाठले. जिद्दीने मजल दर मजल करीत काल (दि.१५) दुपारी त्यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्पवर पाऊल ठेवले. भारताचा राष्ट्रध्वज फडकावून गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत त्यांनी गायले.याक्षणी त्यांना एव्हरेस्ट शिखर खुणावत होते. आत्मविश्वास, जबरदस्त इच्छाशक्ती आणि योगशास्त्रातील यम, नियम, प्राणायाम यांचा या कठीण वाटचालीत त्यांना खूप उपयोग झाला. असे त्यांनी नमूद केले.





### घरून पाठिंबा, अनेकांचे प्रोत्साहन

नलिनी कड या योगशास्त्र तज्ज्ञ आहेत. योग शिक्षिका असून सायकलीस्ट, ट्रेकर या भूमिकेतून त्यांनी अनेक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांनी धाडसीपणे विविध प्रसंगात अडकलेल्यांना सहाय्य करुन सुखरूप सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. अश्या घटनांमध्ये त्यांनी महिला सुरक्षितता, सबलीकरण यासाठी आपले कौशल्य पणाला लावले. त्यांना कायमच त्यांचे पती व पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांची साथ असते. नलिनी या संगमनेर येथील स्व.पोलीस निरीक्षक आबासाहेब शंकरराव देशमुख यांच्या कन्या आहेत. त्यांना या उपक्रमासाठी त्यांची मुले नयन व मयंक तसेच अनेक मैत्रिणी, सहकाऱ्यांनी प्रोत्साहन दिले. दि.२२ रोजी नलिनी कड यांचे नाशिकला आगमन होईल.

# श्रीक्षेत्र सप्तश्रृंग गड येथे श्री भगवती मूर्ती संवर्धन अंतर्गत आयुतचंडी यागाचे आयोजन

**सप्तश्रृंग गड ।** श्री भगवती मुर्ती संवर्धन प्रक्रीयेचे कामकाज करणेकामी बुधवार, दि.२०/०७/२०२२ रोजी धार्मिक विधीचे आयोजन करुन दि.२१/०७/२०२२ पासून प्रत्यक्ष श्री भगवती स्वरुप / मुर्ती देखभाल संबंधीत कार्यवाही सुरु असतांना १० हजार दुर्गा सप्तशती पाठाचे वाचन करण्याचे नियोजन करण्यात येवून दि.०५/०९/२०२२ पावेतो श्री भगवती स्वरुप / मुर्ती संवर्धनाचे काम पुर्ण करुन दि.०६/०९/२०२२ ते दि.०८/०९/२०२२ या कालावधीत आवश्यक ते धार्मिक विधी पुरोहीत वर्गाच्या हस्ते पुर्ण केले. तदनंतर श्री भगवती मुर्ती संवर्धन प्रक्रीये दरम्यान विविध क्षेत्रावरील पुरोहीत वर्गा मार्फत १०००० सप्तशती पाठाचे वाचन करण्यात आले. संदर्भिय पाठाची पुर्णाहूती म्हणून दि.१४/०४/२०२५ ते दि.२१/०४/२०२५ या दरम्यान आयुतचंडी यागाचे नियोजन विश्वस्त संस्थेच्या वतीने करण्यात आले असून, त्याकरीता तुळजापुर, माहूर, कोल्हापुर या शक्तीपिठासह श्रीक्षेत्र नाशिक, त्र्यंबकेश्ववर यांसह श्रीक्षेत्र सप्तशृंगगड स्थानिक पुरोहीत वर्ग यांचे संयुक्त विद्यमाने किमान १२५ ब्रम्हवृंदाच्या उपस्थितीत प. पू. श्री. गणेश्वर शास्त्री द्रविड, वाराणसी, वेदमुर्ती धनपाठी प. पू. श्री. शांताराम शास्त्री भानोसे गुरुजी (ब्रम्हा), वेदमुर्ती घनपाठी प. पू. श्री. दिनेशशास्त्री गायधनी गुरुजी (गाणपत्य), नाशिक, वेदशास्त्र संपन्न प. पू. श्री. बाळासाहेब दिक्षीत (गुरुजी), त्र्यंबकेश्वर यांसह वेदमुर्ती श्री. मिलींद दिक्षीत (आचार्य) यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रावरील ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, कुण्डाचार्य, कुण्डब्रम्हा इत्यादी ब्रम्हवृंदाच्या उपस्थितीत सुरु असून, प्रथमदिनी प्रायचितसाठी मा. अध्यक्ष श्री. बी. व्ही. वाघ, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी तथा तहसिलदार श्री. रोहीदास वारुळे, ॲड श्री. ललित निकम, ॲड श्री. दिपक पाटोदकर, सौ. मनज्योत पाटील, डॉ. श्री. प्रशांत देवरे व श्री. भूषणराज तळेकर यांच्या उपस्थितीत सुरु होवून दि.१५/०४/२०२५ ते दि.२१/०४/२०२५ दरम्यान श्री भगवती मंदिरात संकल्प पुजनासह अंगभूत गणेश पुजन, प्रातः पुजन यांसह अभिषेक हवन व सायं. आरती असा उपक्रम दैनंदिन स्वरुपात नियोजीत आहेत.



विश्वस्त संस्थेमार्फत प्रमुख यजमान म्हणून श्री. भूषणराज तळेकर हे सपत्नीक उपस्थित असून, यांसह दैनंदिन स्वरुपात विश्वस्त मंडळ प्रतिनिधी पुजेसाठी निमंत्रीत केले आहेत.

# जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे उद्‌घाटन; उपस्थितांनी घेतली जलप्रतिज्ञा

**नाशिक ।** जलसंपदा विभागातर्फे मंगळवारपासून (दि. १५) सुरू झालेल्या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे उदघाटन आमदार देवयानी फरांदे यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सुबोध मोरे, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ, वाघाड उपसा सिंचन योजनेचे संचालक गोवर्धन कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध नद्यांतून आणलेल्या जलाचे पूजन झाले. तसेच जलप्रतिज्ञा घेण्यात आली. त्यानंतर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त जनजागृती करणाऱ्या चित्ररथाचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. आ. फरांदे म्हणाल्या की, जलव्यवस्थापन महत्वाचा विषय आहे. या पंधरवड्यात विविध उपक्रम राबवीत नागरिकांना पाण्याचे महत्व सांगावे. राज्य शासनातर्फे सिंचनासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम आगामी काळात पाहावयास मिळतील. जिल्ह्यात पाण्याची उपलब्धता मुबलक आहे. पाणी वितरणाचे व्यवस्थापन करून गळती रोखणे आवश्यक आहे. त्यासाठी उपाययोजना कराव्यात. नाशिक शहर, जिल्ह्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे आगामी २० वर्षांचे नियोजन करावे. जल प्रदूषण थांबविण्यासाठी उपाययोजना व्हाव्यात, असेही त्यांनी सांगितले.






अधीक्षक अभियंता मोरे म्हणाले की, जलजीवन मिशन हा सरकारचा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जलसंपदा विभागाचे नेहमीच सहकार्य राहिले आहे. पाण्याची गळती रोखण्यासाठी जलवाहिनीचा उपयोग केला जातो. फडोळ यांनी सांगितले की, पाण्याचा काटकसरीने वापर होण्यासाठी ग्रामपंचायतस्तरावर अनुषंगिक उपाययोजना करतानाच जल व्यवस्थापनासाठी नियोजन करण्यात येईल. अधीक्षक अभियंता गोवर्धने यांनी प्रास्ताविक केले. पाण्याचा उपयोग, पाण्याचा काटकसरीने वापर, जल प्रदूषण थांबविणे याविषयी मार्गदर्शन केले. शहाणे यांनी आभार मानले. यावेळी शेतकरी, जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

